## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
## (सकाळ)

जा.क्र. १६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०८/०१/२०१८

**१) संगनमत करुन बिना पास परवाना गौण खणीज चोरी करुन नेतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०७/०१/२०१८ चे ०९.३० वाजता दरम्यान यातील आठही आरोपीतांनी संगनमत करुन कुठल्यातरी नदी पात्रातील गौण खणीज रेती ०४ ब्रास किंमती ०८,०००/–रु. ची चोरी करुन ०४ ट्रॅक्टर मध्ये भरुन वाहतुक करीत असतांनी मिळुन आले, सदर गौण खणीज बाळगण्याचे कोणतेही पास परवाना मिळुन न आल्याने फिर्यादी पृथ्वीराज विठ्ठल अहिर वय ३८ वर्ष रा. यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३७९,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. संतापे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) गैर कायदयाची मंडळी जमवुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०७/०१/२०१८ चे १६.३० वाजता दरम्यान यातील आरोपी हे दुसऱ्या व्यक्तीला मारहान करीत असता फिर्यादीने आमचे दुकानातील खर्च्यानी कशाला मारहान करता असे हटकले? असता यातील आरोपीतांनी गैर कायदयाची मंडळी जमवुन फिर्यादीला व ईतर ४ लोकांनी लाथा बुक्यांनी व फिर्यादीचे दुकानातील खुर्चानी मारहान करुन खुर्ची तोडुन फिर्यादीचे दुकानावर दगड फेक केली. व सामानाची नुकसान करुन शांताराम शहारे यास अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम १४३,१४७,१४८,१४९,३३६,४२७,२९४,३२३,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. कोरेटी पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**३) फासटॅक्ट कंपनीच्या बॅग मधील ओरीजन कागपत्र व इतर साहित्यांची चोरी . :–**

दिनांक ०७/०१/२०१८ चे १२.३० वाजता. दरम्यान यातील ओपी क्र. १ ने फिर्यादीस गुप्ता ऑटो मोबाईल चा दुकानाचा पत्ता विचारले असता फिर्यादीने तो माहीत नसल्याचे सांगीतले त्याच वेळी आरोपी क्र. २ हा फिर्यादी जवळ आला व चर्चा करु लागला चर्चे दरम्यान आरोपी क्र. १ ने पुजे करीता समोरचे दुकानातुन अगरबत्ती आणुन देण्यास फिर्यादीला सांगीतले, त्या दुकानाची चर्चा करतांना ते दोघेही सज्जन व्यक्ती असल्याने फिर्यादीला वाटल्यामुळे आपल्या हातातील बॅग थोडया वेळासाठी आरोपी क्र.१ च्या हातात दिली, व अगरबत्ती आनण्यास दुकानात गेला अगरबत्ती घेवुन परत आला तेव्हा ते दोघेही तेथे मिळुन आले नाही. त्याचा शोध घेतला असता मिळुन आले नाही. आरोपी क्र. १ व २ यांनी फिर्यादीची कोणतीही समत्ती नसतांना त्याची काळया रंगाची फासटॅक्ट कंपनीची बॅग ज्यामध्ये नगदी ५,०००/–रु. मोटोजी ०२ कंपनीचा ॲनरॉईड मोबाईल किंमती ८,०००/–रु. पॅन कार्ड, आधार कार्ड, ईलेक्शन कार्ड, ड्रायव्हींग लायसन्स दु चाकी क्र. एमएच ३६ टी ७६६३ व चार चाकी वाहन क्र. एमएच ४९ एएस ५०८५ चे आरसीबुक व ईतर सर्व ओरीजनल कागदपत्र, स्टेट बॅकेचे एटीएम कार्ड व चेक बुक, बॅकेचा आयडी कार्ड असा एकुण १३,०००/–रु. चा माल बॅग सह चोरुन घेवुन गेल्याने फिर्यादी गंगाधर दिवारु पराते वय ५७ वर्ष, रा. आंनद अपार्टमेंट प्लट क्र. अंबा शिवशक्ती नगर मानेवाडा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गोंडाने पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

४) क्षुल्लक कारणावरुन डोक्यावर लोखंडी बत्ता मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक ०७/०१/२०१८ चे १९.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी रितीक शेखर वासनिक वय १६ वर्ष, रा. कोचे गॅस एजंसी जवळ आंबेडकर वार्ड हा आरोपीचे पानठेल्यात चहा पिण्याकरीता गेला असता, आरोपीस न विचारता चहात लिंबु पिळण्याचे कारणा वरुन दोघामध्ये वाद होवुन रागाचे भरात आरोपीने त्याचे हातातील लोखंडी बत्ता फिर्यादीचे डोक्यावर मारुन जखमी केल्याने फिर्यादी बयान व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काटेखाये पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

५) आयसर ट्रकच्या धडकेत ट्रॅक्टर चालक जखमी . :—

दिनांक ०६/०१/२०१८ चे २२.४४५ वाजता दरम्यान यातील जखमी फिर्यादी देवेंन्द्र शामराव बोरकर वय २१ वर्ष, रा. विरसी हा त्याचे ट्रॅक्टर क्र. एम. एच ३६/६३७६ मध्ये कापगते पेट्रोल पंप येथुन डिझेल भरुन एन. एच.०६ रोडने विरसी येथे जात असता मागेहुन येणाऱ्या आरोपी आयसर ट्रक चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व हयगयीने चालवुन फिर्यादीचे ट्रॅक्टरला मागेहुन जोरात धडक देवुन ट्रॅक्टर पलटी होण्यास व ट्रॅक्टर चे चालक फिर्यादीस जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने जखमी फिर्यादीचे बयाण व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३३७ भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

६) चारचाकी गाडीच्या धडकेत एक जखमी . :—

दिनांक ०७/०१/२०१८ चे ११.१५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी मधुकर पुणाजी कठाणे वय ५१ वर्ष, रा. डेंगरगाव हा मोटार सायकल क्र. एच. एच ३१/ए. एन ३३२० ने रेमाचंद रामदास कठाणे सोबत निमगाव मार्गे ढिवरखेड येथे जात असतांना यातील आरोपी ओमनी गाडीचे चालकाने त्याचे ताब्यातील वाहण भरधाव वेगाने व निष्काळजीपने चालवुन फिर्यादीचे मोटार सायकल ला धडक मारुन फिर्यादी व मोटार सायकल चालक कठाणे यांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम २७९,३३७,३३८ भादवी. सहकलम १८४,१३४/१८७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. कोल्हे पोलीस स्टेशन पालांदुर हे करीत आहेत.

७) विहीरीचे पाण्यात बुडुन इसमाचा मृत्यु . :—

दिनांक ०७/०१/२०१८ चे ०८.३० वा. ते ०९.३० वाजता. दरम्यान यातील फिर्यादीचा भाऊ मृतक दिनेश आसाराम हजारे वय ५० वर्ष,रा. शहरवार्ड तुमसर हा मनोरुग्ण असुन दिनांक ०७/०१/२०१८ चे ०८.३० वा. दर. सकाळी मोठा भावु मृतक हा आईला खर्रा घेण्यासाठी १०/—रु. मागीतले व निघुन गेला थोडया वेळाने आई शौच्छालयाकरीता शेतातील विहीरीजवळ गेली असता विहीरीजवळ मृतक ची चप्पल दिसल्यामुळे शेजारील लोकांना अवाज देवुन बोलाविले व विहीरीत गळ टाकुन पाहीले तर मृतक दिनेश हा विहीरीचे पाण्यात मृत पावलेला दिसल्याने फिर्यादी प्रदीप आसाराम हजारे वय ४५ वर्ष, रा. शहरवार्ड तुमसर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास मपोउपनी. मेसरे पो.स्टे तुमसर हे करीत आहेत.

**७) अवैध दारु/जुगार अड्डयांवर धाडी . :–**

दिनांक ०७/०१/२०१८रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा व लाखांदुर येथे अवैध दारू/जुगार अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १० लिटर हातभट्टी दारू किंमती १०००/–रु. तसेच ७२० मिली लिटर देशी दारु किंमती २०८/–रु. तसेच जुगारातुन किंमती ३८०/–रु. असा एकुण १,५८८/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

**८) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक ०७/१२/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १०० प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी – ०१ तीन सिटर वाहनांवरती– ०८ केसेस व ईतर वाहनांवरती –९१ केसेस करण्यात आले आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.